SUNFLAG STEEL

**SUNFLAG IRON & STEEL CO. LTD.**
REGD. OFFICE :
33, MOUNT ROAD, SADAR, NAGPUR - 440 001 (INDIA)
PH.: 2524661, 2532901, 2520356, 2520358 FAX : 0712-2520360
E-Mail : admin@sunflagsteel.com
Website : www.sunflagsteel.com
CIN:L27100MH1984PLC034003

**Through Online Filing / e-Mail**

SECY / SE / 2020 / 365-366
Monday, the 31st August, 2020

To,
**The General Manager,**
Department of Corporate Services,
**BSE Limited**
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
**MUMBAI – 400 001**

To,
The Manager, Listing Department,
**National Stock Exchange of India Ltd.,**
"Exchange Plaza", C - 1, Block - G,
Bandra – Kurla Complex, Bandra (East),
**MUMBAI – 400 051**

**Sub:** ***Newspaper clippings -Notice of Annual General Meeting.***

***Ref: BSE Scrip Code: 500404 / NSE Scrip Symbol: SUNFLAG***

Dear Sir/Madam,

Pursuant to the Regulation 30 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 (as amended), and in compliance with the Ministry of Corporate Affairs (MCA) Circular No. 20/2020 dated May 5, 2020 read with General Circulars dated April 8, 2020 and April 13, 2020 issued by the MCA and SEBI Circular dated May 12, 2020, please find enclosed herewith the copies of the public notice of the 34th Annual General Meeting of the Company to be held on Monday, the 21st September, 2020 at 3.00 p.m. IST through Video Conferencing (VC) / Other Audio Visual Means (OAVM) published on 31st August, 2020 in "The Indian Express" in English language and in "Lok Satta", in Marathi language.

This is also available on the website of the Company at www.sunflagsteel.com

This is for your information and record.

For **Sunflag Iron and Steel Company Limited**

SUNFLAG IRON & STEEL CO. LTD. NAGPUR

**CS Ashutosh Mishra**
Company Secretary & Compliance Officer
Membership No. ACS – 23011
33, Mount Road, Sadar, Nagpur – 440001
Ph: +91 7122524661 /M: 9373793288
Email: avm@sunflagsteel.com

*Encl.: As above.*

# करोना बळींची संख्या एक हजार पार

## शहरी भागातील ७६५ मृत्यूंचा समावेश; २४ तासांत ३२ मृत्यू; १,३१३ बाधितांची भर

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**नागपूर :** येथील शहरी व ग्रामीण भागात गेल्या २४ तासांत नवीन ३२ मृत्यू झाल्याने आजपर्यंतच्या बळींची संख्या एक हजार पार गेली आहे. पैकी ७६५ मृत्यू शहरी भागातील आहेत. तर येथे दिवसभरात नवीन १,३१३ बाधितांची भर पडल्याने आजपर्यंतच्या बाधितांची संख्याही २८ हजार पार गेल्याने सामान्यांमध्ये चिंता वाढली आहे.

गेल्या २४ तासांत दगावलेल्या ३२ रुग्णांमध्ये शहरी भागातील २३, ग्रामीण भागातील ७ आणि जिल्ह्याबाहेरील येथे उपचारासाठी दाखल असलेल्या २ रुग्णांचा समावेश आहे. त्यामुळे येथील आजपर्यंत दगावलेल्या बाधितांची संख्या १ हजार ११ वर पोहचली आहे. त्यात नागपूर महापालिका हद्दीत राहणाऱ्या ७६५ मृत्यू, ग्रामीण भागातील १४९ मृत्यू तर जिल्ह्याबाहेरील येथे उपचार घेणाऱ्या ९७ मृत्यूंचा समावेश आहे.

येथील विविध शासकीय व खासगी रुग्णालयांत करोना बळी नोंदीचा एक हजारचा टप्पा पार झाल्यावरही आजारावर नियंत्रण मिळत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

जिल्ह्यातील सर्वाधिक मृत्यूंची नोंद ही मेडिकल आणि मेयो रुग्णालयांत झाली आहे. दरम्यान, शहरात नवीन १ हजार ३१३ बाधितांमध्ये शहरी भागातील १ हजार १५६ रुग्ण, ग्रामीणचे १५५ रुग्ण तर जिल्ह्याबाहेरील २ रुग्णांचा समावेश आहे. त्यामुळे आजपर्यंत येथील बाधितांची एकूण संख्या तब्बल २८ हजार ३२८ वर पोहचली आहे.

त्यातील सर्वाधिक २१ हजार ८४३ बाधित शहरी भागातील, ६ हजार २०६ रुग्ण ग्रामीण भागातील, २७९ रुग्ण जिल्ह्याबाहेरील येथील रुग्णालयांत उपचाराला आलेले आहेत.

### २ हजार बाधित रुग्णालयांत

शहरातील मेडिकल, मेयो, एम्ससह इतर शासकीय व खासगी कोविड रुग्णालये, कोविड केअर सेंटरमध्ये सध्या २ हजार ८९ बाधितांवर उपचार सुरू आहे. पैकी बहुतांश रुग्णांना ऑक्सिजन अथवा व्हेंटिलेटरची गरज असल्याचा प्रशासनाचा दावा आहे.

### पाणीपुरवठा करणाऱ्या ११ टँकरचालकांना बाधा

उपराजधानीच्या विविध भागात पाणीपुरवठा करणाऱ्या ओसीडब्ल्यू कंपनीच्या ७५ टँकरचालकांची करोना चाचणी करण्यात आली. पैकी तब्बल ११ जणांना विषाणूची बाधा असल्याचे पुढे आल्याने अधिकाऱ्यांत खळबळ उडाली. पैकी बहुतांश कर्मचारी लक्षणे नसलेले असून त्यांना विलगीकरणात घेत त्यांच्यावर उपचारही सुरू करण्यात आला आहे. या टँकरच्या माध्यमातून शहरातील झोपडपट्टी परिसराततच जास्त पाण्याचा पुरवठा होत होता. त्यामुळे झोपडपट्टी परिसरातील नागरिकांमध्येही भीतीचे वातावरण आहे, तर ओसीडब्ल्यूने कर्मचाऱ्यांची विशेष काळजी घेत असून सर्व कार्यालयांत थर्मल स्कॅनर, ऑक्सिमीटरसह इतर आवश्यक साधने उपलब्ध करत कर्मचाऱ्यांची काळजी घेतली जात असल्याचे सांगितले आहे, तर कार्यालयंचे नियमित निर्जंतुकीकरण केले जात असून कुणाला धोका नसल्याचा दावा केला. या घटनेमुळे सुमारे ११ टँकरचे काम थांबवण्यात आले होते. परंतु आता इतर चालकांची व्यवस्था करत पुन्हा सेवा पूर्ववत झाल्याचा ओसीडब्ल्यूचा दावा आहे.

### करोनामुक्तांची संख्या १८ हजारावर

शहरी भागात दिवसभरात ९८७ तर ग्रामीण भागात ६७ असे एकूण १ हजार ५४ जन करोनामुक्त झाल्याची नोंद जिल्हा प्रशासनाकडे करण्यात आली. त्यामुळे आजपर्यंत येथील करोनामुक्त झालेल्यांची संख्या १८ हजार २१ वर पोहचली आहे. पैकी १३ हजार ४६६ जण शहरी भागातील तर ४ हजार ५५५ जण ग्रामीण भागातील आहेत.

### ५,८९४ सक्रिय रुग्ण गृहविलगीकरणात

येथील शहरी भागात ७ हजार १५५ तर ग्रामीण भागात २ हजार १४१ असे एकूण ९ हजार २९६ सक्रिय रुग्ण आहे. तर रविवारी दुपारी १ हजार ३१३ नवीन बाधितांपर्यंत प्रशासन पोहचण्याचा प्रयत्न करत होती. एकूण सक्रिय रुग्णांपैकी तब्बल ५ हजार ८९४ जणांवर गृहविलगीकरणातच उपचार सुरू होते.

### 'बधिरीकरणशास्त्र विभागाची भूमिका महत्त्वाची'

मेयोच्या कोविड रुग्णालयाच्या उभारणीत बधिरीकरणशास्त्र विभागातील प्रत्येक अधिकाऱ्याची महत्त्वाची भूमिका आहे. येथील ऑक्सिजनची यंत्रणा उभारणे, व्हेंटिलेटरची सोय करणे, सर्वच रुग्णांच्या सोयी करण्यासाठी बधिरीकरणशास्त्र विभागाच्या डॉक्टरांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे, तर रुग्णसेवेतही बधिरीकरणसास्त्र विभाग उत्कृष्ट काम करत आहे. त्यामुळे सुरुवातीला मेयोतील बाधितांचा मृत्यूदरही कमी ठेवण्यात यश मिळाले होते. परंतु आता विलंबाने बाधित रुग्ण अत्यवस्थ अवस्थेत उपचाराला येत असल्याने मृत्यूदर वाढला असून तो कमी करण्यासाठी मेयो प्रशासन पूर्ण क्षमतेने प्रयत्न करत असल्याचे मेयोच्या बधिरीकरणशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. वैशाली शेलगावकर यांनी सांगितले.

# 'एक कप चाय विदर्भ राज्य के नाम' उपक्रम सुरू

## वेगळ्या विदर्भासाठी अभिनव उपक्रम

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**नागपूर :** विदर्भ राज्य आंदोलन समितीतर्फे विविध आंदोलन करून वेगळ्या राज्याची मागणी लावून धरणाऱ्या समितीच्या युवा शाखेने 'एक कप चाय विदर्भ राज्य के नाम' हा उपक्रम आजपासून नागपुरातील वाठोडा येथून सुरू केला.

विदर्भ राज्य मागणीचा विषय सातत्याने चर्चिला जावा तसेच चहाच्या दुकानातून तीन-चार लोकांना रोजगार मिळावा, असा हेतू या उपक्रमाचा आहे. या चहाच्या दुकानातून विकणाऱ्या प्रत्येक चहा कपावरील एक रुपया विदर्भ राज्य आंदोलनासाठी देण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लहानपणी आपण रेल्वेस्थानकावर चहा विकल्याचा दावा केल्याने चहाचा वापर राजकीय चर्चा, सभेत होऊ लागला आहे. विदर्भ राज्याची मागणी करणाऱ्या युवकांनीही ही क्लृप्ती वापरली असून त्यातून जनजागृती, पैसा आणि रोजगार देखील निर्मिती होईल, असा त्याचा दावा आहे.

यासंदर्भात सुयोग नील दावार म्हणाले, विदर्भवादी युवा टीमच्या वतीने हा नाविन्यपूर्ण उपक्रम विदर्भात सुरू करण्यात येत आहे. विदर्भवादी चहाचे पहिले दुकान रविवारी सुरू झाले. विश्वास हायस्कूल जवळ, श्रीकृष्ण नगर, वाठोडा रिंग रोड येथील दुकानातून एक कप चहा विक्रीतून एक रुपया विदर्भ आंदोलनाला देणगी देणार आहेत.

प्रत्येक दुकानातून ३ ते ४ युवकांना रोजगार मिळू शकेल. विदर्भ राज्याच्या मागणीचा प्रचार करण्यासाठी हा उपक्रम आहे.


**सुनिल हायटेक इंजिनिअर्स लिमिटेड (परिसमापनातील)**
परिसमापकाचा पत्ता : ४१६, क्रिस्टल पॅराडाईज को-ऑप. सोसा. लि., दत्ताजी साळवी मार्ग, पिझ्झा एक्सप्रेसच्या वरती, विरा देसाई रोड लगत, अंधेरी (प), मुंबई-४०००५३;
संपर्क : +९१ ९१३७०५८९२८; ईमेल : auction.shel@gmail.com

ई-लिलाव – आयबीसी, २०१६ अंतर्गत मत्तेची विक्रि
लिलावाची तारीख व वेळ : ०९ ऑक्टोबर २०२० (शुक्रवार) रोजी स.११:०० ते दु.०१.००
(प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

परिसमापन प्रक्रिया विनियमांच्या विनियम ३३ सासह वाचलेल्या आयबीसी, २०१६ च्या कलम ३५(एफ) अंतर्गत परिसमापनाच्या भाग होत असलेल्या **सुनिल हायटेक इंजिनिअर्स लिमिटेड** (परिसमापनातील) यांच्या मालकीच्या मत्तेचे विक्रि. ई-लिलावाचे आयोजन **"जसे आहे जेथे आहे आणि जसे आहे जे काही आहे"** या तत्वावर करण्यात येणार आहे.
विक्रि **https://ncltauction.auctiontiger.net** या वेबसाईटद्वारा ई-लिलाव सेवा-पुरवठाकार **ई-प्रोक्युअरमेंट टेक्नॉलॉजीस लिमिटेड – ऑक्शन टायगर** यांच्या मार्फत निम्नस्वाक्षरीकाराद्वारा करण्यात येईल.

आयएनआर मध्ये रक्कम

| अनु क्र. | मत्ता | एरिआ (चौ.मी.) | राखीव किमत | इरठे | बोली वृद्धी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | फ्लॅट नं. १०१ / २०१ / ३०१ आणि मेझानाईन फ्लोअर, श्री स्वामी प्लाझा, एनआयटी प्लॉट नं. ९७, ईस्ट हाय कोर्ट रोड, रामदासपेठ, नागपूर. | १०६४ | ५,६३,३२,४०० | ५६,३३,२४० | १०,००,००० |
| २ | ई-५०१, ५वा मजला, सॅटालाईट टॉवर, पंचाशिल बिल्डर, कोरेगाव पार्क, पुणे. | ११८ | १,३२,७९,००० | १३,२७,९०० | २,००,००० |
| ३ | प्लॉट नं. २४८, खसारा नं. ४६२/१, वेस्ट कोर्बा, व्हिलेज आगरकर, स्किम जेयुडीपी, जमानीपाल, कोर्बा, छत्तीसगढ. | ३३४.४५ | ५०,३२,००० | ५,०३,२०० | १,००,००० |
| ४ | प्लॉट नं. २४७, खसारा नं. ४६२/१, वेस्ट कोर्बा, व्हिलेज आगरकर, स्किम जेयुडीपी, जमानीपाल, कोर्बा, छत्तीसगढ. | ३३४.४५ | २९,०४,००० | २,९०,४०० | ५०,००० |

पाहणीकरिता शेवटची तारीख : ०५ ऑक्टोबर २०२० (सोमवार)
इरठे सादरीकरणाची शेवटची तारीख : ०७ ऑक्टोबर २०२० (बुधवार) रोजी सांय ०५.०० वा पर्यंत
ई-लिलावाची तारीख व वेळ : ०९ ऑक्टोबर २०२० (शुक्रवार) रोजी स.११:०० ते दु.०१:००
नोंद : ऑनलाईन लिलाव विक्रिच्या सविस्तर शर्ती व अटी, ई-लिलाव बोली कागदपत्रे, घोषणा व अन्य तपशील **https://ncltauction.auctiontiger.net** या वेबसाईटवर तसेच **https://sunilhitech.com** या सुनिल हायटेक इंजिनिअर्स लिमिटेडच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. कोणत्याही स्पष्टिकरणाबाबत कृपया **auction.shel@gmail.com** यावरुन निम्नस्वाक्षरीकाराशी संपर्क साधावा.

तारीख : ३१ ऑगस्ट २०२०
स्थळ : मुंबई

स्वाक्षरी/-
ॲश्विल मेनेझेस
सुनिल हायटेक इंजिनिअर्स लिमिटेडचे परिसमापक म्हणून
दिनांकित २५ जून २०१९ आदेशाद्वारा
आयपी रजिस्ट्रेशन नं. आयबीबीआय / आयपीए-००१ / आयपी-पी००१७ / २०१६-१७ / १००४१
पत्ता : ४१६, क्रिस्टल पॅराडाईज को-ऑप. सोसा. लि., दत्ताजी साळवी मार्ग, पिझ्झा एक्सप्रेसच्या वरती, विरा देसाई रोड लगत, अंधेरी (प), मुंबई-४०००५३
ईमेल : auction.shel@gmail.com


# ४८ गावांतील २६४९० लोकांना पुराचा फटका

## नागपूर जिल्ह्यातील अनेक गावांना पुराचा विळखा

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्याने कन्हान, पेंचसह इतरही नद्यांना आलेल्या पुरामुळे शनिवारी गंभीर झालेली पूरस्थिती रविवारी नियंत्रणात आली. दोन दिवसात विविध ठिकाणी पुरात अडकलेल्या जिल्ह्यातील ४८ गावांतील २६४९० लोकांना पुराचा फटका बसला. त्यांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले. ५१८८ पूरपीडितांची ४७ निवारा शिबिरात व्यवस्था करण्यात आली.

आज दिवसभर बचावकार्य सुरू होते. या कामात लष्करासह एनडीआर एफची एक, एसडीआरएफच्या तीन तुकड्यांची मदत लाभली, पोलीस, महसूलआणि स्थानिक नागरिकांनी बचाव कार्यात मदत केली.

पुराचा फटका, सावनेर मौदा, कामठी आणि पारशिवनी तालुक्यातील गावांना बसला. जिल्हा प्रशासनानाकडून प्राप्त माहितीनुसार, एकूण ४८ गावांना पुराचा फटका बसला. त्यातील १४८०० नागरिक विविध ठिकाणी अडकले होते. त्यांना सुरक्षित स्थळी पाठवण्यात आले. त्यात मौदा तालुक्यातील १२ गावातील २९३८, कामठी तालुक्यातील ९ गावातील ८१३२, पारशिवनी तालुक्यातील ७ गावातील १५२४ नागरिकांचा समावेश आहे. शनिवारी उशिरापर्यंत बचावकार्य सुरू होते. धरणातूनही पाणी सोडणे सुरूच असल्याने नद्यांची पाणी पातळी वाढतच होती. त्यामुळे रविवारी काय होणार, याकडे प्रशासन व गावकऱ्यांचे लक्ष होते. मात्र जिल्हा प्रशासनाने केलेल्या नियोजनामुळे तत्काळ बचाव कार्याला सुरुवात झाली.

बिना कामठी येथे ३३ लोकांनी गावातील उंच ठिकाणी आश्रय घेतला होता. त्यांच्या चोहीकडे दोन किलोमीटरपर्यंत सर्वत्र पाणी होते. आपत्ती व्यवस्थापन दलाच्या पथकाने त्यांना बोटीच्या माध्यमातून बाहेर काढले. याच गावातील एक दाम्पत्य त्यांच्या फार्महाऊसवर तर तीन जण मंदिरात अडकले होते. त्यांच्या सुटकेसाठी वायुदलाची मदत हवी म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी राज्य शासनाला कळवले होते. मात्र नंतर बचाव पथकाने त्यांची बोटीतून सुटका केली. कामठी तालुक्यात शनिवारी दुपारी ३ पर्यंत एक हजार लोकांना २५ फूट पाणी साचलेल्या परिसरातून बाहेर काढले होते. सकाळी १० पर्यंत २५०० लोकांची पाण्यातून सुटका करण्यात आली. एकूण १६ तास बचाव कार्य चालले, असे एसडी आरएफचे ललित मिश्रा यांनी सांगितले.

### हेलिकॉप्टरने भोजनाची पाकिटे

पारशिवनी तालुक्यांत सिगरदीप या गावी पुराच्या पाण्यात २२० कुटुंब अडकली होती. पूर्ण गाव पाण्याने वेढले होते. तेथे लोकांना हेलिकॉप्टरच्या मदतीने एनडीआरएएफच्या पथकाने भोजनाची पाकीटे वाटप केले व त्यांना सुरक्षित स्थळी हलवले.

### १७ हजार हेक्टरमधील पिकांची हानी

पुरामुळे जिल्ह्यातील १७८०० हेक्टरवरील पिकांची हानी झाली. यात पारशिवनी तालुक्यातील ३२०० हे. मौदा तालुक्यातील ६८०० हे. कामठी तालुक्यातील २७०० हे आणि कुही तालुक्यातील ५१०० हे. वरील पिकांचा समावेश आहे.



### पुरामुळे अनेक गावे अंधारात !

नागपूरच्या ग्रामीण भागात पुरामुळे अनेक गावातील वीज पुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे तासंतास खंडित राहिलेला पुरवठा रविवारी दिवसभरात सुरळीत केल्याचा दावा महावितरणकडून करण्यात आला आहे. सावनेर, उमरेडमध्ये पुराचे पाणी ओसरले नसल्याने ते ओसरल्यावर येथील पुरवठा सुरळीत होईल. शनिवारी सकाळ पासून जिल्ह्यातील ग्रामीण भागात येणाऱ्या खापरखेडा, पारशिवनी, खापा, कुही, उमरेड, मौदा येथे पुराचे पाणी वाढू लागल्याने परिसरातील वीज पुरवठा महावितरणने टप्प्याटप्प्याटप्याने खबरदारीचा उपाययोजना म्हणून बंद केला. आज सकाळी सावनेर विभागाचे कार्यकारी अभियंता कुलदीप भस्मे, उमरेड विभागाचे कार्यकारी अभियंता प्रफुल्ल लांडे यांनी विज पुरवठा सुरळीत करण्यासाठी सुरुवात केली. मौदा उपविभागात व खापा हद्दीतील बंद केलेले१३ रोहित्र दुपारी दोन वाजता तपासणी करून सुरु केले. तसेच साहुली, डोरली, दहेगाव, नांदोरी, नांदपूर, गडेगाव, दुधबर्डी या गावातील वीजपुरवठा सकाळी ११वाजता सुरळीत करण्यात आला. बिना संगम येथील सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेचे दोन रोहित्र दुपारनंतर सुरू केले. वेकोलीच्या सिंगोरी येथील खाणीत पाणी असल्याने हा परिसर अजूनही अंधारात आहे. उमरेड विभागातील मोहगाव, चिचघाट, सावंगी, खरबी, हरडोली, मसळी आदी गावात सोमवारी वीजपुरवठा सुरळीत करण्यात येईल, असे महावितरणने कळवले आहे.

### सैन्यदलाची पूरग्रस्तांना मदत

उमरेडला लागून असलेल्या कुही तालुक्यातील विविध गावात पूर आला असून येथे सैन्यदलाने मदतकार्य केले. लोकांच्या मदतीसाठी जिल्हा प्रशासनाच्या विनंतीवरून उत्तर महाराष्ट्र व गुजरात सब एरियाच्या जवानांनी शनिवारी मदत व बचाव कार्य केले. कुही तालुक्यातील पूरग्रस्त भागातील लोकांना सैन्यदलाने अन्नवाटपही केले.

### नुकसानीचे पंचनामे करण्याचे पालकमंत्र्यांचे आदेश

जिल्ह्यात पुरामुळे झालेल्या पीक हानीचे तातडीने पंचनामे करा, असे निर्देश पालकमंत्री नितीन राऊत यांनी अधिकाऱ्यांना दिले. रविवारी राऊत यांनी जिल्हाधिकारी रवींद्र ठाकरे यांच्यासह पूरग्रस्त भागाची पाहणी केली. खापरखेडा तालुक्यातील बीना नदीमुळे गावाचा संपर्क तुटलेला आहे, पारशिवनी तालुक्यातील सिंगारदीप या नदीतील पुराच्या पाण्यामुळे शेतातील पिकांची हानी झालेली आहे तसेच मौदा तालुक्यातील कन्हान नदीला आलेल्या पुरात अनेक घरांचे नुकसान झाले.

### चिकना गाव पाण्यात

कामठी तालुक्यातील चिकना या गावाला चारही बाजूंनी १५ फूट पाण्याचा वेढा घातला होता. येथे ७७० ते ८०० लोक अडकले होते. त्यांना एसडीआरएफच्या तुकडीतील २२ जणांनी सकाळी सुरक्षित ठिकाणी हलवले.

## गळफास घेऊन विवाहितेची आत्महत्या

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** कौटुंबिक कलहातून एका विवाहितेने गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली. ही दुर्दैवी घटना मानकापूर परिसरात उघडकीस आली. सव्वीस वर्षीय चंद्रकला सिरसाम असे मृत विवाहितेचे नाव आहे.

चंदू सिरसाम हे मूळचे मध्यप्रदेशातील रहिवाशी असून कामाच्या शोधात ते नागपुरात आले होते. एका कंत्राटदाराकडे ते कामाला लागले. त्याचे सात वर्षांपूर्वी चंद्रकला हिच्याशी लग्न झाले. त्यांना दोन मुले आहेत. मोठा मुलगा पाच वर्षांचा आहे. तो मध्यप्रदेशात चंदूच्या आई-वडिलांकडे राहतो, तर तीन वर्षांच्या मुलासह पती-पत्नी नागपुरात राहतात. गेल्या काही दिवसांपासून चंदू आणि चंद्रकला यांच्यात कौटुंबिक कलह सुरू होता. नेहमाप्रमाणे चंदू हा शनिवारी कामावर निघून गेला. दुपारी चंद्रकलाचा भाऊ आला. तो थेट चंदूच्या कामावर पोहचला. दरम्यान चंद्रकला हिने सायंकाळी स्वयंपाकघरात सिलिंग फॅनला ओढणी बांधून गळफास घेऊन आत्महत्या केली. सायंकाळी चंदू हा साळ्यासह घरी आला तेव्हा ही घटना समोर आली.


**सनफ्लॅग आयर्न अँड इस्टिल कंपनी लिमिटेड**
SUNFLAG STEEL
नोंदणीकृत कार्यालय : ३३, माउंट रोड, सदर, नागपूर-४४०००१.
सीआयएन : L27100MH1984PLC034003
फोन : +91 712 2524661 / 2520356 फॅक्स : +91 712 2520360
ईमेल : investor@sunflagsteel.com वेबसाईट : www.sunflagsteel.com

**चौतीसाव्या (३४व्या) वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार कामकाजावर विचारविनिमय करण्याकरिता **सनफ्लॅग आयर्न अँड स्टिल कंपनी लिमिटेडच्या** सदस्यांची चौतीसावी (३४वी) वार्षिक सर्वसाधारण सभा व्हिडिओ कॉन्फरन्सींग (**"व्हिसी"**) / अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (**"ओएव्हिएम"**) द्वारा सोमवार, २१ सप्टेंबर, २०२० रोजी दु.०३.०० वा (भाप्रवे) घेण्यात येणार आहे.
कोव्हिड-१९ प्रचंड प्रमाणातील उद्रेक लक्षात घेता, सामाजिक अंतराचे पालन करण्याबाबत नियमावली करण्यात आली आहे, तदनुसार, निगम कामकाज मंत्रालयाने ("एमसीए") दिनांकित ०८ एप्रिल, २०२० व १३ एप्रिल, २०२० (यापुढे "एमसीए परिपत्रके" म्हणून संदर्भित) परिपत्रके यासह वाचलेल्या दिनांकित ०५ मे, २०२० तिच्या परिपत्रकाद्वारा सामायिक ठिकाणी सदस्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय "व्हिसी" / "ओएव्हिएम" द्वारा वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यास अनुमती दिलेली आहे. कंपन्या अधिनियम, २०१३ ("कायदा")च्या तरतुदी, सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ ("सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स") आणि एमसीए परिपत्रकांच्या अनुपालनार्थ, आणि प्रत्यक्ष प्रती पाठविण्यात अडचणी निर्माण झाल्यामुळे, वित्तिय वर्ष २०१९-२० करिता वार्षिक अहवाल आणि ३४व्या एजीएमची सूचना भागधारकांना, ज्यांचे ईमेल पत्ते आरटीए / कंपनी / डिपॉझीटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणीकृत आहेत, ईलेक्ट्रॉनिक प्रणालीत पाठविण्यात येत आहेत. ज्या भागधारकांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत आणि परिणामी त्यांना वार्षिक अहवाल, एजीएमची सूचना व ई-मतदान सूचना प्राप्त झालेल्या नाहीत, त्यांनी सदर ईमेल पत्ते पाठविण्याकरिता httsps://www.bigshareonline.com या लिंकवर क्लिक करुन कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजन्ट, बीगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडकडे त्यांचे ईमेल पत्ते व मोबाईल नंबरची तात्पुरती तरतूद करु शकतील. भागधारकांना विनंती करण्यात येते की त्यांनी युजर आयडी व पासवर्डसमवेत ई-मतदान सूचना आणि सूचनेची स्वॉफ्ट प्रत पाठविण्याकरिता ईमेल पत्ता व मोबाईल नंबर प्राप्त करण्याकरिता मार्गदर्शकसूत्रांनुसार प्रक्रियेचे अनुपालन करावे. कोणतीही शंका असल्यास भागधारक jibu@bigshareonline.com यावर ईमेल पाठवू शकतील.
सूचनेसह एकत्रीत चौतीसावा (३४वा) वार्षिक अहवाल २०१९-२०, स्पष्टिकरणात्मक विवरणे, इ. www.sunflagsteel.com या कंपनीच्या वेबसाईटवर आणि https://www.evoting.nsdl.com या नॅशनल सिक्युरिटिज डिपॉझीटरी लिमिटेडच्या (एनएसडीएल), www.bseindia.com या बीएसई लिमिटेडच्या व www.nseindia.com या नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाईट्सवर उपलब्ध आहेत.
सदस्यांना एनएसडीएल केवळ ई-मतदान सिस्टममार्फत "व्हिसी" / "ओएव्हिएम" द्वारा एजीएममध्ये उपस्थित राहण्याकरिता सुविधेची तरतूद करुन देण्यात येईल. एजीएममध्ये सहभागी होण्याबाबत सूचनांची एजीएमच्या सूचनेमध्ये तरतूद करुन देण्यात आली आहे. "व्हिसी" / "ओएव्हिएम" द्वारा एजीएममध्ये हजर राहणाऱ्या सदस्यांची उपस्थिती कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत संख्यावळ मोजमापन प्रयोजनार्थ गणना करण्यात येईल.

**पुस्तिका बंद असणे याबाबत**

याद्वारा सुद्धा सूचना देण्यात येते की सुधारणा नियम, २०१५ समाविष्ट कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम १० यासह वाचलेल्या कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५च्या रेग्युलेशन ४२ च्या अनुसार कंपनीच्या सदस्यांची नोंदवही आणि भाग हस्तांतरण पुस्तिका शनिवार, १२ सप्टेंबर, २०२० पासून ते सोमवार, २१ सप्टेंबर, २०२० पर्यंत (दोन्ही दिवस धरुन) कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या हेतुप्रित्यर्थ बंद ठेवण्यात येईल.
याद्वारा सुद्धा सूचना देण्यात येते की सुधारणा नियम, २०१५ समाविष्ट कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० यासह वाचलेल्या कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम १०८ आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५च्या रेग्युलेशन ४४ च्या अनुसार कंपनीने सर्व भागधारकांना त्यांचे मतदान करण्याकरिता नॅशनल सिक्युरिटिज डिपॉझीटरी लिमिटेडच्या (एनएसडीएल)द्वारा रिमोट ई-मतदान सुविधेची उपलब्धता करुन दिलेली आहे. कट-ऑफ तारीख म्हणजेच १४ सप्टेंबर, २०२० रोजी प्रमाणे प्रत्यक्ष स्वरुपात आणि डिमटेरिअलाईज्ड स्वरुपात भाग असलेले भागधारक ईलेक्ट्रॉनिक प्रणालीत (रिमोट ई-मतदान) तसेच एजीएममध्ये ई-मतदानाद्वारा त्यांचे मतदान करु शकतील. सदस्य रिमोट ई-मतदानाद्वारा मतदानाचा हक्क बजाविल्यानंतर सुद्धा ३४व्या एजीएममध्ये सहभागी होवू शकतील परंतु ३४व्या एजीएममध्ये पुन्हा मतदान करण्यास अनुमती दिली जाणार नाही.
कंपनी अशा भागधारकांना, जे "व्हिसी" / "ओएव्हिएम" द्वारा एजीएममध्ये उपस्थित राहणार आहेत आणि ज्यांनी रिमोट ई-मतदानाद्वारा त्यांचे मतदान केलेले नाही त्यांना एजीएम कालावधीत ई-मतदान सुविधेची सुद्धा तरतूद करुन देत आहे. त्याबाबत प्रक्रिया समाविष्ट सविस्तर माहिती, ई-मतदानाबद्दल माहिती एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आली आहे.
रिमोट ई-मतदानाचा कालावधी शुक्रवार, १८ सप्टेंबर, २०२० रोजी स.०९.०० वा सुरु होईल आणि रविवार, २० सप्टेंबर, २०२० रोजी सांय ०५.०० वा संपेल. रिमोट ई-मतदान तदनंतर निःसमर्थ करण्यात येईल.
कोणतीही शंका असल्यास तुम्ही www.evoting.nsdl.com यावरील डाउनलोड सेक्शनकडील भागधारकांना उपलब्ध असलेले ई-मतदान युजर मॅन्युअल आणि भागधारकांकरिता असलेल्या फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्यू'ज) पाहू शकाल किंवा टोल-फ्रि क्र. 1800-222-990 यावर कॉल करु शकाल किंवा pallavid@nsdl.co.in / +91 22 24994559 यावर श्रीमती पल्लवी म्हात्रे किंवा amit@nsdl.co.in / +91 22 24994360 यावर श्री अमित विशाल यांच्याशी संपर्क साधू शकाल.

सनफ्लॅग आयर्न अँड स्टिल कंपनी लिमिटेडकरिता
सीएस आशुतोष मिश्रा
कंपनी सचिव
ICSI सदस्यत्व क्र. ACS-23011

स्थळ : नागपूर
तारीख : ३० ऑगस्ट, २०२०



लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. | 25 रौप्य महोत्सवी वर्ष | 1995 - 2020

सप्रेम नमस्कार,

आजवर अनेकदा आपल्याशी पत्राद्वारे संवाद साधला. पण आज हे पत्र लिहिताना मनामध्ये वेगवेगळ्या भावनांचे तरंग उठताहेत. कारण अभिमानानं छाती फुगली आहे आणि कृतज्ञतेनं मन भरून आलंय! अभिमान लोकमान्यच्या रौप्य महोत्सवाचा आणि कृतज्ञता आपण दाखवलेल्या अपार विश्वासाप्रती, आपल्या प्रेमाप्रती!

'लोकमान्य'ची सुरुवात झाली ती समाजामध्ये प्रत्येकाला प्रगतीची आणि समृद्धीची समान संधी मिळावी या उद्देशानं! संस्थेचा विस्तार झाला. विविध क्षेत्रांमध्ये प्रवेश करून, सभासदांप्रतिची बांधिलकी जपत गुंतवणूक सुरक्षितच नव्हे; तर अधिक बळकट करण्यावर भर दिला. त्याची फळं आपल्याला चाखायला मिळत आहेत. आकड्यांच्या फूटपट्टीवर यशाचं मोजमाप केलं तर ते सोन्यासारखं लखलखीत झळाळतंय! पण त्याहून अधिक मोलाचं मानक म्हणजे आनंद! त्यामुळेच असंख्य माणसं, घरं, व्यवसाय अशा सर्वांची आनंदाची जी एक कथा असेल, त्या कथेचा लोकमान्य भाग असेल. आणि ही प्रत्येक कथा लोकमान्यची यशोगाथा सांगेल.

लोकमान्यच्या कार्यपद्धतीमध्ये कालानुरूप बदल होत गेले आहेत. आगामी काळात तंत्रज्ञानाची कास धरणे अपरिहार्यच आहे. लोकमान्यही लवकरच सर्व सेवा ऑनलाईन माध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचवेल. आजच्या काळामध्ये ही गरजच आहे. अन्यथा एरवी आपण रौप्य महोत्सवाचा सोहळा साजरा केला असता. जेव्हा जगावरचं हे करोनाचं संकट टळेल, तेव्हा असा सोहळा नक्की साजरा करू. तोवर सुरक्षित रहा. लोकमान्यच्या रौप्य महोत्सवासाठी आपणा सर्वांचे पुन्हा एकदा हार्दिक अभिनंदन आणि मनःपूर्वक आभार!

कळावे,
आपला विश्वासू
K D Thakur
किरण ठाकूर
आणि लोकमान्य परिवार

आज पूर्ण होणाऱ्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त
अभिनंदन आणि आभार!

स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि.
संस्थापक - अध्यक्ष : श्री. किरण ठाकूर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 | lokmanyasociety.org महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg.No.M.S.C.S./C.R./140/2002